## ८५ व्या मराठी नाट्य संमेलनास
## हार्दिक शुभेच्छा

८५ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन डोंबिवली येथे होत असल्याचे समजून आनंद वाटला. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर जगाच्या पाठीवर जेथे जेथे मराठी माणूस गेला, तेथे तेथे त्याने आपले नाट्यवेड जोपासले आहे. मराठी माणसाच्या भावना व्यक्त करण्याचे नाटक हे साधन बनले आहे. नाट्य संमेलनाच्या शताब्दी वर्षात डोंबिवली येथे नाट्यसंमेलन होत आहे, हा डोंबिवलीकरांच्या दृष्टीने चांगला योग आहे. या संमेलनास उपस्थित राहणाऱ्या नाटय रसिकांना निखळ आनंद उपभोगता येईल आणि या निमित्त प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेत मराठी नाट्य सृष्टीच्या वाटचालीची माहिती समाविष्ट केली जाईल, अशी मला आशा वाटते. नाट्य संमेलनास माझ्या हार्दिक शुभेच्छा.

(विलासराव देशमुख)
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

---

## ८५ व्या मराठी नाट्य संमेलनास
## हार्दिक शुभेच्छा

२९ व ३० जानेवारी २००५ रोजी डोंबिवलीत अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन भरणार असल्याचे समजून आनंद वाटला. मावळते अध्यक्ष श्री. शं. ना. नवरे आणि नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. सुरेश खरे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणारे हे नाट्य संमेलन म्हणजे नाट्य-रसिकांना एक पर्वणीच होय. मराठी नाटकाची सुरूवात सांगलीत झाली. शतकापेक्षा जास्त काळाची दीर्घ परंपरा असलेल्या मराठी नाट्य सृष्टीने करमणुकीच्या क्षेत्रात आपले आगळे-वेगळे स्थान निर्माण केले. मराठी नाटकांची ही धवल परंपरा अनेक नाट्याचार्यांनी बळकट केली. मराठी नाटकांसमोर उभ्या ठाकलेल्या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी उपाय सुचवण्याच्या दृष्टीने डोंबिवलीतल्या नाट्य संमेलनात विचार-विनिमय होईल, असा मला विश्वास वाटतो. पंचाऐंशीव्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्या यशस्वितेसाठी तसेच स्मरणिकेसाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा!

(आर. आर. पाटील)
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य